नि.फौ.ख.क्र.४४५/२०२१
शासन वि. सागर मनोहर तायडे+१
नि.क्र.०९
**CNR :NO:MHBU06-001783-2021**

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१

मी शपथेवर खरे कथन करतो की,

नाव : अरबाज खान दस्तगीर खान,

वय : २८ वर्ष,

व्यवसाय : चालक ,

राहणार : फाटकपुरा,खामगावं,
जिल्हा- बुलढाणा.

सरतपास:

सरतपास, सरकार तर्फे सरकारी वकील, सौ.व्ही.जी.बोकारे यांच्यातर्फे सुरू:

मी, सर्व आरोपींना ओळखते कारण ते ते माझ्यासोबत मार्केटमध्ये काम करतात. घटना ३ ते ४ वर्षांपूर्वी घडली होती. घटना कॉटन मार्केट खामगाव येथे रात्री १०.०० ते १०.३० वाजेच्या दरम्यान घडली होती.आज रोजी मला घटनेचा निश्चित वेळ सांगता येणार नाही. आमच्यामध्ये बोलचाल झाली होती. त्या व्यतिरिक्त काहीही घडले नव्हते.पळापळी झाल्यामुळे मी खाली पडलो होतो.म्हणून मी दवाखान्यात गेलो होतोमी, पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिला होता.आता, मला सरकारी वकिलांनी मी, दिलेला तोंडी रिपोर्ट दाखविला, त्यातील मजकूर खरा नाही.परंतु त्यावर माझी सही आहे. तोंडी रिपोर्ट वरचे फिर्यादीच्या सहीला निशाणी क्रमांक.१० देण्यात येत

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2025.12.20 17:00:27 +0530

आहे.आता, मला सरकारी वकिलांनी, मी दिलेला एफ.आय .आर दाखविला, त्यावर माझी सही आहे. परंतु त्यातील मजकूर खरा नाही. एफ.आय.आर वरचे फिर्यादीच्या सहीला निशाणी क्रमांक.११ देण्यात येत आहे. पोलिसांनी माझा जबाब घेतला नव्हता. मी,दवाखान्यात गेले नव्हतो . माझ्याकडे पोलीस चौकशीसाठी आले नव्हते. पोलिसांनी माझा जबाब घेतला नव्हता.

सरकारी वकिलांतर्फे सरतपास पूर्ण:

सरकारी वकिलांनी उलटतपासाची परवानगी मागितली, त्यानुसार सरकारी वकिलांना भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये उलटतपासाची परवानगी देण्यात येत आहे.

उलटतपास सरकारी वकिलांतर्फे:

२. हे म्हणे बरोबर आहे की, दिनांक ०९.११.२०२० रोजी रात्री ०१.०० वाजेच्या सुमारास मी माझा ट्रक क्रमांक.MH-22-AA-9499 हा घेऊन कॉटन मार्केट येथे आलो होतो. हे म्हणणे बरोबर आहे की, त्यावेळेस माझा मावस भाऊ साबीर खान अल्तमस खान माझ्यासोबत होता. हे म्हणणे बरोबर आहे की, रात्री ११.०० वाजेच्या सुमारास मी मोटरसायकल जवळ गेलो असता मला तिथे विकी तायडे बसलेला दिसला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2025.12.20 17:00:36 +0530

३. हे म्हणणे खरे नाही की, मी त्याला म्हणालो की, मोटर सायकल मधला पेट्रोल काढू नको त्यावेळेस त्याने मला सांगितले की, मी पेट्रोल काढणार तुझ्या ने जे होईल ते करून घे. हे म्हणणे खरे नाही की, तेवढ्यात सागर तायडे तिथे आला आणि त्याने फायटरने माझ्या डोक्यामध्ये मारले. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या डोक्याला जखम होऊन रक्त निघाले होते. हे म्हणणे खरे नाही की, तिथे माझा मावस भाऊ आला असता सागर तायडे ने त्यालाही फायटरने मारहाण करून जखमी केले होते. हे म्हणणे खरे नाही की, दोन्ही आरोपींनी मला शिवीगाळ देऊन जीवे मारण्याची धमकी दिली होती. हे म्हणे बरोबर आहे की,आमचे भांडण वखार अहमद आणि शाहरुख यांनी सोडविले होते.

४. आता मला सरकारी वकिलांनी माझ्या तोंडी रिपोर्ट मधला पोर्शन मार्क अ वाचून दाखविला, तो मी, पोलिसांना माझी तोंडी रिपोर्ट देता वेळेस सांगितला नव्हता. मला कारण सांगता येणार नाही की, पोलिसांनी माझ्या तोंडी रिपोर्ट मध्ये पोर्शन मार्क अ का नमूद केला.आता मला सरकारी वकिलांनी माझा जबाब मधला पोर्शन मार्क ब वाचून दाखविला, तो मी, पोलिसांना माझा जबाब देता वेळेस सांगितला नव्हता. मला कारण सांगता येणार नाही

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2025.12.20 17:00:45 +0530

की, पोलिसांनी माझ्या जबाब मध्ये पोर्शन मार्क ब का नमूद केला.

५. हे म्हणणे बरोबर आहे की, न्यायालया बाहेर आरोपीसोबत आपसात समजवता होऊन आमचे भांडण मिटलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमचे भांडण आपसात मिटलेले असल्यामुळे आरोपींना वाचवण्याकरिता आज रोजी मी, खोटी साक्षी दिली.

सरकारी वकिलांतर्फे उलट तपास पूर्णण.
उलटतपास आरोपी तर्फे श्री . मोहम्मद इलियास वकिलांतर्फे: नाकारले.
उलटतपास पूर्ण:
फेरतपास पूर्ण: श्रवणोत्तर स्वीकृत
दि.२०/१२/२०२५

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2025.12.20 17:00:53 +0530

**(एफ.टी.शेख)**
सह. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
खामगांव, जिल्हा- बुलढाणा.